**महाराष्ट्र शासन**
**कृषी विभाग**
**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प**
**३० अ/ ब, आर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड मुबई -४०० ००५**
**दुरध्वनी क्र. : ०२२ २२१६३३५१/५२** **ई-मेल : pmu@mahapocra.gov.in**

नस्ती क्र:- NDKSP-१२०४१(४३)/३/२०२५-O/O ADM-NDKSP दि : २० .११.२०२५

**कार्यालयीन आदेश**

**विषय :- नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत सहायक जनमाहिती अधिकारी, जनमाहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी घोषित करणेबाबत.**

**संदर्भ :-** १. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ व माहितीचा अधिकार नियम, २००५
२. कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. कृवपदुम-१९०४६/३६/२०२५-MAG-८A (E-११६८०५०), दि.०८.०७.२०२५
३. कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. कृवपदुम-१९०४६/१३/२०२५-MAG-८A (E-१२०७१४५), दि. ०५.०८.२०२५

जागतिक बँकेच्या सहकार्याने कृषी विभागांतर्गत नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ ची अंमलबजावणी सुरू आहे. माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५ नुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणासाठी सहायक जनमाहिती अधिकारी, जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने प्रकल्प व्यवस्थापन कक्षासाठी खालीलप्रमाणे सहायक जनमाहिती अधिकारी, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी घोषित करण्यात येत आहे.

| कार्यालय | सहायक जनमाहिती अधिकारी | जनमाहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|
| नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प- प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, मुंबई | प्रकल्प सहायक (समन्वयक) ०२२-२२१६३३५२ | प्रकल्प प्रशासन अधिकारी ०२२-२२१६३३५२ | प्रकल्प उपसंचालक ०२२-२२१६३३५२ |

२. उपरोक्त घोषित सहायक जनमाहिती अधिकारी रजेवर असलेल्या कालावधीत प्रकल्प सहाय्यक (कृषिविद्या तथा मृदा) हे सहायक जनमाहिती अधिकारी म्हणून काम पाहतील. तसेच, जनमाहिती अधिकारी यांच्या रजेच्या कालावधीत लेखाधिकारी हे जनमाहिती अधिकारी म्हणून, आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या रजेच्या कालावधीत वित्त विशेषज्ञ हे प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून कार्यभार सांभाळतील.

(परिमल सिंह)
प्रकल्प संचालक

**प्रत माहितीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव**

प्रकल्प व्यवस्थापन कक्षातील संबंधित अधिकारी व कर्मचारी, प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, मुंबई

Signed by Parimal Singh
Date: 20-11-2025 16:38:16